# मिरा भाईंदर महानगरपालिका

## सामान्य प्रशासन विभाग

मुख्यालय, पहिला मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
दूरध्वनी क्र-022-28192828 ई-मेल आयडी- gad@mbmc.gov.in

जा.क्र. मनपा/ सा.प्र. /३७८ /२०२५-२६ दि. ०७ /०८ /२०२५

### || जाहिर सूचना ||

भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या 79 व्या वर्धापन दिनानिमित्त जनतेच्या मनात स्वातंत्र्यलढयाच्या स्मृती तेवत राहाव्यात, स्वातंत्र्य संग्रामातील अज्ञात नायक/क्रांतीकारक/स्वातंत्र्य संग्रामातील घडलेल्या विविध घटनांचे स्मरण व्हावे व देशभक्तीची जाज्वल्य भावना जनमानसात रहावी या उद्देशाने या दैदिप्यमान इतिहासाचे अभिमानपूर्वक संस्मरण करण्यासाठी शासनाने दिलेल्या सुचनांचे अनुपालन करुन "हर घर तिरंगा" हा उपक्रम मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत राबविणेचा असल्याने खालील नमुद तपशिलानुसार पात्र व इच्छुक ठेकेदार/पुरवठाधारक यांचेकडून दि.07/08/2025 ते दि.11/08/2025 दु.1.00 वाजेपर्यंत ऑफलाईन पध्दतीने दरपत्रक मागवीण्यात येत आहे. या बाबतची सवीस्तर माहिती https://mbmc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. लिफाफा क्र.01 दि.11/08/2024 रोजी दु.2.00 वाजता उप-आयुक्त (मुख्यालय) यांचे उपस्थितीत उघडण्यात येईल. सदरहू कामाचा संक्षिप्त तपशील निविदा पत्रकांत नमुद करणेत आलेला आहे.

| अ.क्र. | कामाचे स्वरुप | अंदाजपत्रकीय किंमत (Estimate Cost) सर्व करासहित | EMD | निविदा पत्रकाची किंमत |
|---|---|---|---|---|
| 1) | भारतीय ध्वज संहिता नुसार राष्ट्रध्वज हे हाताने कातलेल्या आणि हाताने विणलेल्या किंवा मशीनद्वारे तयार केलेल्या सुत/पॉलिस्टर/लोकर/सिल्क /खादी पासून बनविलेल्या कापडाचे मनपा ने दिलेल्या नमुना पॉलिस्टर रोटो प्रमाणे व साईज 450 मी.मी. X 300 मी.मी. नुसार पुरवठा करणे (एकुण 20,000) | रु.7,00,000/- | रु.19,000/- | रु.4,484/- With GST |
| 2) | साईज 1800 मी.मी. X 1200 मी.मी. राष्ट्रध्वज पुरवठा करणे (एकुण 4) | | | |
| 3) | साईज 1350 मी.मी. X 900 मी.मी. राष्ट्रध्वज पुरवठा करणे (एकुण 5) | | | |
| 4) | 3 फुट उंचीचे व 10 मीटर रुंदीचे तिरंगा कापड पुरवठा करणे (एकुण 2) | | | |

(कल्पिता पिंपळे)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपलिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## दरपत्रक फॉर्म

**कामाचे नाव :- "हर घर तिरंगा" उपक्रम** राबविणेकरीता दरपत्रक मागविणेबाबत..

निविदाधारकाचे **नाव, पत्ता व भ्रमणध्वनी क्र.:-**

..........................................................................................................................................

..........................................................................................................................................

..........................................................................................................................................

| अ.क्र. | कामाचे स्वरुप | सादर करावयाचे दर रु. |
|---|---|---|
| 1) | भारतीय ध्वज संहिता नुसार राष्ट्रध्वज हे हाताने कातलेल्या आणि हाताने विणलेल्या किंवा मशीनद्वारे तयार केलेल्या सुत/पॉलिस्टर/लोकर/सिल्क /खादी पासून बनविलेल्या कापडाचे मनपा ने दिलेल्या नमुना पॉलिस्टर रोटो प्रमाणे व साईज 450 मी.मी. X 300 मी.मी. नुसार पुरवठा करणे (एकुण 20,000) | रु.................................. /- (एकुण खर्च) |
| 2) | साईज 1800 मी.मी. X 1200 मी.मी. राष्ट्रध्वज पुरवठा करणे (एकुण 4) | |
| 3) | साईज 1350 मी.मी. X 900 मी.मी. राष्ट्रध्वज पुरवठा करणे (एकुण 5) | |
| 4) | 3 फुट उंचीचे व 10 मीटर रुंदीचे तिरंगा कापड पुरवठा करणे (एकुण 2) | |

निविदाधारकाची स्वाक्षरी -

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**सामान्य प्रशासन विभाग**

मुख्यालय, पहिला मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)

दूरध्वनी क्र-022-28192828 ई-मेल आयडी- gad@mbmc.gov.in


जा.क्र. मनपा/ सा.प्र. /३१८/२०२५-२६ दि.०७/०८/२०२५

## निविदा पत्रकाविषयी नियम व अटी-शर्ती

1. निविदापत्रका संबंधीची सविस्तर माहिती विनामूल्य कार्यालयीन वेळेत मनपाचे सामान्य प्रशासन विभागात मिळेल.
2. निविदापत्रकाची फी व EMD रोख स्वरुपात मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, पहिला मजला, सामान्य प्रशासन विभाग, भाईंदर (प) येथे दि.11/08/2024 रोजी दुपारी 01.00 वाजेपर्यंत भरण्यात यावी. चेकने रक्कम स्विकारली जाणार नाही.
3. निविदा दरपत्रकाची फी ना-परतावा राहील याची नोंद घ्यावी.
4. प्राप्त निविदातील एक अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता मंजूर अथवा नामंजूर करण्याचा हक्क महापालिकेने रोखून ठेवला आहे.
5. निविदाधारकांनी ऑफलाईन फॉर्म भरताना दोन लिफाफा पध्दतीने छायांकित प्रतीसह खालीलप्रमाणे सादर कराव्यात. (लिफाफा क्र.01 - कादगपत्रे व लिफाफा क्र.02 - दरपत्रक)

**अ) लिफाफा क्र. 1 मध्ये खालील कागदपत्रांचा समावेश करणे आवश्यक आहे.**

1. निविदा फी व EMD ची अनामत भरलेली पावती.
2. दुकान नोंदणी प्रमाणपत्र, पॅनकार्ड, जी. एस.टी रजिस्ट्रेशन सर्टिफीकेट
3. शासकीय निमशासकीय कार्यालयात, शाळा व महाविद्यालयमध्ये साहित्य पुरविणेकामी काम केल्याचा पुर्णत्वाचा अनुभव दाखला
4. मागील 03 वर्षाची आयटी रिटर्न (सन 2022-2023, 2023-2024 व 2024-2025 या वर्षाचे)
5. शासकीय व निमशासकीय काळ्या यादीत समाविष्ट केले नसल्याबाबतचे स्वयंघोषणा पत्र/हमीपत्र.

**आ) लिफाफा क्र. 2 मधील कागदपत्रांचा समावेश करणे आवश्यक आहे.**

1. दरपत्रक
2. लिफाफा क्र.01 मधील कागदपत्रांची पूर्तता करणाऱ्या निविदाधारकांचा लिफाफा क्र.02 उघडण्यात येईल.

➢ **पुरवठा कालावधी :-**

**प्रथमपक्ष मिरा भाईंदर** महानगरपालिकेस 1) भारतीय ध्वज संहिता नुसार राष्ट्रध्वज हे हाताने **कातलेल्या आणि हाताने विणलेल्या किंवा मशीनद्वारे तयार केलेल्या** सुत/पॉलिस्टर/लोकर/सिल्क /खादी **पासून बनविलेल्या कापडाचे मनपा ने दिलेल्या नमुना पॉलिस्टर रोटो प्रमाणे व साईज 450 मी.मी. X 300 मी.मी (एकुण 20,000) 2) साईज 1800 मी.मी. X 1200 मी.मी. राष्ट्रध्वज (एकुण 4) 3) साईज 1350 मी.मी. X 900 मी.मी. राष्ट्रध्वज (एकुण 5) व 4) 3 फुट उंचीचे व 10 मीटर रुंदीचे तिरंगा** कापड पुरवठा करणे (एकुण 2) पुरवठा करावयाचे आहे.

- पुरवठा आदेश पुरवठाधारकास मिळाल्यानंतर मिरा भाईंदर महानगरपालिका सामान्य प्रशासन विभाग सुचित करेल त्या ठिकाणी पुरवठा करुन देणेचा आहे. तसेच सदरचे साहित्य पुरवठा करणेस असमर्थ ठरल्यामुळे सदरचे काम महापालिकेस इतर संस्था/ पुरवठाधारकाकडून करून घ्यावे लागल्यास जो खर्च होईल त्याचे दुप्पट खर्च सदरचे निविदाधारकाकडून वसुल केले जाईल. सदरची रक्कम संबंधित पुरवठाधारकास देय असलेल्या बिलाचे अथवा अनामत रक्कमेमधुन कपात करुन वा अन्य कायदेशीर बाबींचा अवलंब करुन वसूल करुन घेणेचा अधिकार प्रथमपक्ष मिरा भाईंदर महानगरपालिका, मा.आयुक्त यांना राहिल.
- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आदेशानुसार आवश्यक साहित्याचा पुरवठा विहित मुदतीत न केल्यास / वा अर्धवट पुरवठा केल्यास, निविदाधारक यांचेकडून त्या पुरवठा कार्यादेशावर होणारे किंमतीवर प्रति दिवस 1% प्रमाणे दंड आकारणी करण्यात येईल. सदरची रक्कम संबंधित पुरवठाधारकास देय असलेल्या बिलाचे अथवा अनामत रक्कमेमधुन कपात करुन वा अन्य कायदेशीर बाबींचा अवलंब करुन वसूल करुन घेणेचा अधिकार प्रथमपक्ष मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त यांना राहिल.

- **साहित्याचा दर्जा :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेस पुरविणेत येणारे झेंडे उत्कृष्ट दर्जाचे असावेत. तसेच सदर झेंडे निकृष्ट दर्जाचे आढळून आल्यास सदर झेंडे तातडीने बदलून देणेची जबाबदारी ठेकेदार यांची राहील.

- **वाहतूक व इतर करांबाबत :-**

निविदापत्रकात नमुद केलेले दर हे सर्व प्रकारचे कर व वाहतूक खर्चासह समाविष्ठ असतील यासाठी वेगळी कोणतीही रक्कम पुरवठाधारकास मिळणार नाही. सदर कामाकरिता साहित्य पुरवठा करतेवेळी आवश्यक मनुष्यबळाची व्यवस्था पुरवठाधारकाने करावयाची आहे. देयक अदा करताना आयकर, सरचार्ज, TDS-GST व शासकीय नियमानुसार अन्य कर वसूल करावयाचे झाल्यास ते वसूल करण्यात येईल.

- **ठेका रद्द करण्याची कारणे**
  - साहित्याबाबत तक्रार प्राप्त झाल्यास तक्रारीबाबतची खातर जमा करुन ठेका रद्द करण्यात येईल.
  - निविदामध्ये व करारनाम्यात नमूद केलेल्या अटी शर्ती भंग केल्यास ठेका रद्द केला जाईल व अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.
  - नियुक्त पुरवठाधारकाने मंजूर कार्यदेशाप्रमाणे साहित्य उपलब्ध करुन देण्यास असमर्थ ठरला व नकार दिल्यास त्याची सुरक्षा रक्कम जप्त करण्यात येईल,

- **इतर अटी व शर्ती:-**
  - मंजूर निविदेतील पुरवठा किंवा अन्य कोणत्याही बाबतीत वाद निर्माण झाल्यास मिरा भाईंदर महानगरपालिका, मा.आयुक्त यांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहिल. तसेच याबाबतीत काही कायदेशीर कारवाई झाल्यास दोन्ही बाजूच्या खर्चाची संपूर्ण जबाबदारी संबंधित ठेकेदारांवर राहील,

- कोणतीही निविदापत्रिका पुर्णपणे किंवा अंशतः स्विकारणे किंवा आलेल्या सर्व निविदा नाकारण्याचे अधिकार महानगरपालिकेचे आहेत. तसेच कोणतेही कारण न देता एक अथवा सर्वच निविदा रद्द करण्याचा आधिकार महानगरपालिकेने राखून ठेवला आहे.
- ज्या निविदाधारकाचे दर मंजूर करणेत येईल, त्यांचे एकूण देयकाच्या रक्कमेवर 10% सुरक्षा अनामत रक्कम भरावी लागेल व त्यांनतर आवश्यक स्टॅम्प पेपर वर करारनामा करण्यात येईल.
- L1 यांनी काम करणेस असमर्थता व्यक्त केलेस EMD जप्त करणेत येईल.
- सदरची निविदा मिळविण्याकरिता महानगरपालिका अधिकारी यांच्यावर कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्याचे कोणत्याही क्षणी आढळल्यास निविदाधारक यांची निविदा रद्द करण्यात येईल व सदर निविदाधारक यांना काळ्या यादीत टाकण्याची कार्यवाही करण्यात येईल.
- प्राप्त निविदातील एक अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता मंजूर अथवा नामंजूर करण्याचा हक्क महापालिकेने राखून ठेवला आहे.
- निविदाधारकाने निविदा सादर करताना निविदेतील नियम व अटी मान्य असल्याबाबत त्यावर शिक्यासह सही करणे बंधनकारक आहे.

(कल्पिता पिंपळे)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपलिका